सं.फौ.ख.क्र. १८२/२०१९

**<u>घोडेगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात फौजदारी प्रक्रिया संहितेचे प्रकरण २० नुसार चालविण्यात येणारा खटला.</u>**

**सं.फौ.ख.क्र. १८२/२०१९**
**निशाणी २**

| | |
|---|---|
| १. गुन्हा घडल्याचा दिनांक | :१६/०३/२०१९ |
| २. फिर्याद दाखल दिनांक | :१६/०३/२०१९ |
| ३. अभियोग पक्ष | :**महाराष्ट्र सरकार**<br>प्रभारी अधिकारी मंचर पोलीस ठाणे यांचे मार्फत |
| ४. आरोपीचे नाव | : निखील दत्तात्रय वाघ<br>वय : २५ वर्षे, व्यवसाय : नोकरी<br>रा. रांजणी ता. आंबेगाव, जि. पुणे. |
| ५. आरोपाचा सारांश | : |

तुम्ही दिनांक १६/०३/२०१९ रोजी मंचर घोडेगाव रोडवर तपनेश्वर मंदिराजवळ, मंचर ता. आंबेगांव जि. पुणे येथे तुमच्या ताब्यातील हिरो कंपनीची शाईन गाडी नं. एम.एच. १४ ई झेड ४७३५ ही व्यक्तींना धोका निर्माण होईल अशा पध्दतीने व सार्वजनिक ठिकाणावरून जाणारे व्यक्तींना अटकाव व इजा होईल अशा पध्दतीने वाहन उभे करून निघुन गेलात म्हणून तुम्ही भारतीय दंड विधान १८६० चे कलम २८३ अन्वये शिक्षेस पात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला असे.

दि. १८/०३/२०१९ — बी.बी.चौहान
ठिकाण : घोडेगाव — प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट २

घोडेगांव,पुणे

६. आरोपीचा जबाब :

प्रश्न १ : तुम्हाला पोलीस कागदपत्राच्या नकला मिळाल्या काय?
उत्तर : होय.

प्रश्न २ : तुम्हांला आता मराठीत वाचून दाखविलेले व समजावून सांगितलेले आरोप समजले काय?
उत्तर : होय.

प्रश्न ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?
उत्तर : मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही/अंगठा समक्ष

दि. १८/०३/२०१९ बी.बी.चौहान
ठिकाण : घोडेगाव प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट २
घोडेगांव,पुणे

## <u>कारणमिमांसा</u>

**१.** आरोपीला समजावले की त्याने गुन्हा कबूल केल्यामुळे त्याला ₹ २००/— पर्यंत दंडाची शिक्षा होवू शकते. तरी देखील त्याला गुन्हा कबूल आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केला असल्याची माझी खात्री झालेली आहे.

**२.** आरोपी २५ वर्ष वयाचा इसम आहे. त्याच्यावर त्याचे कुटूंबीय

अवलंबून असल्याचे त्याने सांगितले. सदर गुन्हा आरोपीचा पहिलाच असल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यास सुधारण्याची संधी देणे न्याय दृष्टीने योग्य वाटते. म्हणूण त्यास ₹ २००/— चा दंडची शिक्षा करणे उचीत ठरेल.

**३.** वरील सर्व गोष्टीचा विचार करता मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

आरोपीला फौजदारी प्रक्रीया संहीता चे कलम २५२ प्रमाणे भारतीय दंड विधान १८६० चे कलम २८३ अन्वये दोषी धरून ₹ २००/— (दोनशे रूपये) चा दंड भरण्याची शिक्षा देण्यात येते व दंड न भरल्यास त्याने ०३ दिवस साधी कैदेची शिक्षा देण्यात येते आहे.

दि. १८/०३/२०१९
ठिकाण : घोडेगाव

बी.बी.चौहान
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट २
घोडेगांव,पुणे